VOL- IX | ISSUE- X | OCTOBER | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्य : उदय, प्रवृत्ती व महत्त्व, यांचा अभ्यास

**डॉ. सुलभा उल्हास पाटील,**
सहयोगी प्राध्यापक,
गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
संगमनेर- ४२२६०५.
जि.- अहमदनगर.
Email- sulbhapatil63@gmail.com

**सारांश –**

*"विचार हा नवनिर्मितीक्षम व अखिल मानवतेचे कल्याण साधणारा तो विचार." या दृष्टीने विचार करणारा व तसे लेखन करणारा तो विचारवंत या दृष्टीने वैचारिक साहित्याचा उदय कसा झाला, त्यातील मुख्य प्रवृत्ती कशा आहेत, व त्या विघातक आहेत वा विधायक हे शोधून त्यांचे महत्त्व शोधणे, व सर्वात महत्वाचे म्हणजे "या वैचारिक प्रक्रियेतून सत्यान्वेशन करुन मानव मुक्तीचे दार खुले होणे ही या संशोधनाची महत्त्वाची गरज आहे. एकूणच स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्य हे भारतीय प्राचीन वारसा सांगणाऱ्या विचारधारेपेक्षा त्यातील विरोधाभास, संकुचितता, यांवर प्रकाश टाकून तिसऱ्या-चौथ्या शतकांपासूनचा बौद्धकालीन भारत, त्यांतील विकास, समता, समृद्धी व सांस्कृतिक पार्श्वभूमी या अंगाने जाऊन धर्म, ईश्वर, संस्कृती, चातुर्वर्ण्य, इतिहास, शिवकालीन इतिहास, इत्यादी अंगाने विश्लेषण करणारे, सत्याची पाळेमुळे खणून काढणारे असे आहे.*

***महत्वाच्या संकल्पना {Key words}*** *–विचार, विचार- प्रक्रिया, वैचारिक साहित्य, पुरोगामी, सांख्य तत्वज्ञान, लोकायत तत्वज्ञान*

**प्रस्तावना –**

**मा**नवाचे इतर प्राण्यांपेक्षा वेगळे वैशिष्ट्य म्हणजे- भाषा, विचार व बोलणे या गोष्टी होत.यामुळेच लेखन व मुद्रणकला अस्तित्वात नव्हती तेंव्हापासूनच कोणत्या ना कोणत्या रुपात विचारांची अभिव्यक्ती होत असतांना दिसून येते. त्यातील एक प्रकार म्हणजे साहित्य होय. "साहित्य हा समाजाचा आरसा असतो,"असे म्हटले जाते. कारण भाव-भावना, विचार यांचे संप्रेषण साहित्यातून होत असते. आणि म्हणूनच "प्रकृती-संस्कृती-विकृती" यांनुसार माणूस जगत असतो.त्याचेच चित्रिकरण साहित्यातून स्वाभाविकपणे होत असते. मात्र सर्वसाधारणपणे सर्वांची नसली तरी निवडक का होईना काही लोकांची अशी धारणा व ईच्छा असते की, व्यक्ती व समाजाने चांगले, समृद्ध, सुखी व आनंदी जीवन जगावे.साहित्यिक वा लेखन करणारा हा ज्या हेतूने लेखन करत असतो, त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडलेले स्वाभाविकपणे दिसून येते.आणि म्हणून ललित साहित्य, सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक....इत्यादी प्रकार साहित्यात निर्माण झालेले दिसून येतात.

भारतात अगदी प्राचीन काळापासूनच हे प्रवाह निर्माण झालेले दिसून येतात. या प्रवाहांत भिन्नता, मतमतांतरे दिसून येतात. आणि म्हणूनच वैदिक तत्वज्ञाना बरोबरच सांख्य तत्वज्ञान, लोकायत तत्वज्ञान, .....इत्यादी सुद्धा दिसून येतात.

भारतात वैचारिक साहित्यात साधरणत: तीन टप्पे दिसून येतात-

१- सुरुवातीचा निसर्ग नियम, सृष्टी, जीवन कसे जगावे इत्यादी संदर्भात विवेचन.

२- वर्तमान जीवन, समाजव्यवस्था इत्यादी स्वरूपाचे लेखन

३- सुरुवातीपासूनचे मानवी जीवन, त्याचे स्वरुप, व ते बरोबर वा चूक इत्यादी स्वरूपाचे विवेचन.

प्रस्तुत टप्पे ढोबळमानाने केलेले आहेत. पहिल्या टप्प्यात आपल्याला चार वेद, उपनिषदे, आरण्यके....इत्यादी आणता येतील. दुसऱ्या टप्प्यात वर्तमानावर प्रकाश टाकणारे चित्रण जसे- संत साहित्य, मनुस्मृती, बौद्ध साहित्य. व तिसरा टप्पा म्हणजे अगदी मानव जीवनाच्या प्राथमिक काळापासून जे जनजीवन चालत आलेले आहे, ते कसे आहे, मानवता व अस्तित्वात असलेल्या जीवनाची चाकोरी ही मानवतेशी निगडीत आहे वा कशी...[आता यात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक.....अशा अनेक बाबींशी निगडीत असणारे वर्तन-परिवर्तनानुसार अनेक प्रवाह, धारा, काल व तदनुषंगिक यांची सरमिसळ गृहीत आहे.हे टप्पे फक्त प्रस्तुत संशोधनाच्या विवेचनाच्या सोयीसाठी केलेले आहेत.] तर –

तिसरा टप्पा हा खऱ्या अर्थाने युरोप व भारतातील प्रबोधन काळ, भारतीय स्वातंत्र्य प्राप्ती व लोकशाहीची निर्मिती ...यांचे फळ असला तरी खऱ्या अर्थाने याचा पाया भारतच काय, तर अखिल विश्वात तथागत गौतम बुद्ध यांनी घातलेला आहे. "प्रकृती" धर्मानुसार पहिला टप्पा दिसून येतो.हा म्हणजे पंचमहाभूते यांना सृष्टीचा निर्माता मानणारा. दुसरा टप्पा हा "विकृत" धर्मानुसार दिसून येतो. यात वैदिक संस्कृतीनुसार, धर्म, पुराणे, मनुस्मृती यांनी व्यापलेला आहे. तर तिसरा टप्पा हा "संस्कृती" पण मानवसंस्कृती" नुसार चाललेला दिसून येतो.आधी म्हटल्या प्रमाणे- तथागत गौतम बुद्ध यांनी प्रथम " प्रत्येक मानवाने आनंदी, समृद्ध, सुखी व शांततेचे जीवन जगले पाहिजे व तो प्रत्येक मानव प्राण्याचा मूलभूत हक्क आहे हे निर्विवादपणे सांगितले. आकलन शक्तीचा पूर्ण विकास होणे ही गोष्ट अत्यंत मूलगामी व अनन्यसाधारण महत्वाची होती व आहे. याचेच ज्ञान प्राप्त होऊन पुढे बुद्ध हे 'बोधी' झाले, सिद्धार्थ झाले. ज्याचे जीवन खऱ्या सत्यशोधनातून सिद्ध झाले तो, सिद्धार्थ ! मानव जीवन सुंदर, आनंदी व शोषणरहित करायचे असेल तर त्यासाठी प्रत्येक मानवाची 'प्रज्ञा' विकसित व्हायला हवी. प्रत्येक मानवाची आकलनशक्ती पूर्णपणे विकसित व्हायला हवी. जेणेकरून त्याला सभोवताली घडणाऱ्या परीस्थितिचे पूर्ण वा समग्र आकलन व्हायला हवे. केवळ आकलन नाही तर त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या, अडथळे, कसे दूर करता येतील यांसदर्भात साधक-बाधक व सकारात्मक विचार करता यायला हवा. माणसाला माणूस म्हणून पूर्ण विकसित अवस्थेपर्यंत नेता यायला हवे, यासाठी प्रज्ञेची गरज असते. 'प्रज्ञा' हे बुद्धीचे विकसित रुप आहे. जे ज्ञानाचा उपयोग समष्टीचा, समाज वा सार्वत्रिक हिताचा विचार करायला लावते, व्यक्तिगत हिताचा, स्वार्थीपणा व कूटनीतीचा नाही. प्रज्ञेच्या जोडीला 'करुणा' हवी. करुणेने व्यक्ती दु:ख निवारण करण्याच्या कार्यात सक्रीय होते, केवळ नपुसंक विचार करत नाही. या दृष्टीने भारतातील संतांचे कार्य व लेखन किंवा रचना हे मूलभूत वैचारिक साहित्य होय.साध्या-साध्या रचनांतूनही मानवतेचा, समतेचा संदेश त्यातून मिळतो.-"जे का रंजले,गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले,तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा." मला वाटते, हा विचारच खऱ्या अर्थाने वैचारिक परिवर्तनाचा टप्पा होय. कारण पुढील काळात नाथपंथ, भागवत संप्रदाय ते फुले-आम्बेडकर ते आजचे कॉम्रेड शरद पाटील, आ.ह.साळुंखे यांच्या पर्यंत साहित्याचा हा वैचारिक टप्पा मानवाला मानवतेच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न करत आहे. हा खरा प्रागतिक व महत्वाचा टप्पा असल्याने प्रस्तुत संशोधनातही या निवडक विचारवंतांच्या माध्यमातून **"स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्य : उदय, प्रवृत्ती व महत्त्व, यांचा अभ्यास" हा विषय निवडला आहे.**

**संशोधनाची गरज –**

विचार हा अनेक दृष्टीने केला जाऊ शकतो. अगदी मनोरंजन, तार्किक काथ्याकूट सुद्धा त्यात असू शकतो. त्यातून बुद्धी, तर्कशक्ती यांचे प्रत्यंतर येत असले तरी ते 'कूटनीती'वा 'स्वार्थ साधणे' यासाठीही असू शकते.बुद्धिमंथनाचे तो एक चक्रव्यूहही असू शकतो, ज्यातून सर्वसामान्य माणसाचे शोषण केले जाऊ शकते, तो पदोपदी नाडला जाऊ शकतो.[इतिहास याला साक्षी आहे.] यापलिकडे, "विचार हा नवनिर्मितीक्षम व अखिल मानवतेचे कल्याण साधणारा तो विचार" या दृष्टीने विचार करणारा व तसे लेखन करणारा तो विचारवंत या दृष्टीने वैचारिक साहित्याचा उदय कसा झाला, त्यातील मुख्य प्रवृत्ती कशा आहेत, व त्या विघातक आहेत वा विधायक हे शोधून त्यांचे महत्त्व शोधणे, व सर्वात महत्वाचे म्हणजे "या वैचारिक प्रक्रियेतून सत्यान्वेशन करुन मानव मुक्तीचे दार खुले होणे ही या संशोधनाची महत्त्वाची गरज आहे.चारशे वर्षे संतांनी ही भूमी सकस विचारांनी पेरुन ठेवली त्याचेच फळ म्हणजे पूर्ण विश्वात एकमेव छत्रपती शिवाजी महाराजांसारखा युगपुरुष

निर्माण झाला.जगद्गुरू संत तुकाराम महाराज, संत नामदेव,इत्यादीच्या समताधिष्ठित समाज, जातिभेदाचा अंत करणारी शिकवण,अशा प्रबोधनाच्या भूमीतच राजमाता जिजाऊ सारखी व्यक्तिरेखा निर्माण झाली,जिच्या प्रेरणेतूनच स्वराज्य, समता, न्याय निर्माण करणारा, तो संवर्धित करणारा राजा घडत गेला. कारण चांगले विचार पेरले तरच चांगली माणसे व सुदृढ समाज निर्माण होईल.

**समस्या विधान** –

"स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्य : उदय, प्रवृत्ती व महत्त्व, यांचा अभ्यास" हा विषय निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये** –

१- निवडक वैचारिक साहित्य व त्यातून 'अखिल मानव कल्याण' विचारांना मिळालेली प्रेरणा यातील संबंध स्पष्ट करणे.

२- निवडक साहित्य कृतींच्या माध्यमातून संशोधनात्मक वैचारिक साहित्य व इतिहासातील सत्यशोधनाचा मार्ग यांतील संबंध स्पष्ट करणे.

३- निवडक साहित्य कृतींद्वारे वर्तमान भारतीय वैचारिक साहित्याचे स्वरूप स्पष्ट करणे.

**गृहीतके** –

१ पुरोगामी वैचारिक साहित्याच्या अभ्यासातून अखिल मानव कल्याणाच्या दिशेने समाजाचे प्रबोधन होईल.

२पुरोगामी वैचारिक साहित्याच्या अभ्यासातून मानवसमुहांवर होणारे अन्याय, अत्याचार, विविध प्रकारचे शोषण यांची मूळ कारणे शोधतांना धर्म, संस्कृती व इतिहासाचे सत्यान्वेशन होईल.

**संशोधन परिकल्पना** –

पुरोगामी वैचारिक साहित्याच्या माध्यमातून मानव कल्याणाच्या मार्गातील अडथळे कमी होण्यास मदत मिळेल.

**शून्य परिकल्पना** –

पुरोगामी वैचारिक साहित्याच्या माध्यमातून मानव कल्याणाच्या मार्गातील अडथळे कमी होण्यास मदत मिळणार नाही.

**कार्यात्मक व्याख्या** {Key words} –

**१- विचार** - एखाद्या व्यक्तीने विशिष्ट आचरण व्यवस्थेसाठी बुद्धीनिष्ठ केलेला आविष्कार म्हणजे 'विचार' होय.

**२- विचार प्रक्रिया-** "विचारप्रक्रिया ही आपल्या सभोवताली असलेल्या वस्तू, घटना, प्रसंगांचे अवलोकनातून प्रत्यक्ष ज्ञानावर आधारित असते.तसेच अप्रत्यक्षपणेही आपण मन:चक्षुने एखाद्या घटनेचे संदर्भ घेऊन अप्रत्यक्ष ज्ञानावर विचारप्रक्रिया होऊ शकते. विचार प्रक्रियेत संकल्पनाही अंतर्भूत असतात."-[ मराठी विश्वकोश.]

**३ पुरोगामी** – म्हणजे वर्तमानाविषयी वैज्ञानिक दृष्टी असणारे लोक. हे प्रयत्नवादी, प्रगतीवादी, सुधारणावादी, समतावादी, बुद्धिप्रामाण्यवादी,सहिष्णू व धर्मनिरपेक्ष असतात.

**४ सांख्य तत्वज्ञान** – थोडक्यात विवेकज्ञान.कपिल ऋषी हे याचे प्रवर्तक होय.

**५ लोकायत तत्वज्ञान** – बुद्धिप्रामाण्यवादी, जे प्रत्यक्ष दिसते, तेच खरे मानणारा होय,म्हणून ईश्वर दिसत नसल्याने निरीश्वरवादी.

**संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा-**

**व्याप्ती** - या संशोधनाची व्याप्ती भारतीय साहित्य संदर्भात काही निवडक वैचारिक साहित्य कृतींच्या आधारावरच संशोधन करण्यात आले आहे.

**मर्यादा-** फक्त महाराष्ट्राती काही निवडक वैचारिक पुस्तकांचाच आधार या संशोधनासाठी घेण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती** –

"स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय पुरोगामी साहित्याचा उदय, स्वरूप व त्या स्वरूपाची कारणे निश्चित करणे," या संशोधन विषयासाठी अन्वयार्थक संशोधन पद्धती, संदर्भान्वयी संशोधन पद्धती, मानसशास्त्रीय संशोधन पद्धती,सैद्धांतिक संशोधन पद्धती,तौलनिक साहित्याभ्यास पद्धती अशा विविध संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आलेला आहे.

**माहिती निर्वाचन -**

स्वातंत्र्योत्तर भारतातील वैचारिक साहित्य- स्वातंत्र्योत्तर भारतातील वैचारिक साहित्याचे ढोबळमानाने दोन गट प्रकर्षाने जाणवतात. पारंपारिक मनुस्मृतीवर आधारित समाजाचे विवेचन वेदांवर आधारित धर्म, संस्कृती इत्यादीच्या अनुषंगाने करणारा गट.[ज्याला "उपराकार"

लक्ष्मण माने साडेतीन टक्केवाल्यांची संस्कृती असे म्हणतात.] मुख्यत्वे या गटाने इतिहास, धर्म इत्यादींची मांडणी विशिष्ट संकुचित हेतू बाळगून केली. यांमध्ये श्री.गो.स. सरदेसाई, वि.का.राजवाडे, न.र.फाटक, वि.दा.सावरकर .....इत्यादी अनेक. या गटातील विचारवंतानी आपल्याला हवा तसा सोयीस्कर इतिहासाचा अर्थ लावत जनसामान्यांच्या विरुद्ध मुठभर संस्कृती रक्षकांचेच वर्चस्व अबाधित कसे ठेवता येईल या हेतूने लेखणी वापरली.उदाहरणार्थ- अलिकडेच घडवून आणलेले "जेम्स लेन प्रकरण",वि.दा.सावरकरांचे "भारतीय इतिहासातील सात सोनेरी पाने" या पुस्तकात इतिहासातील खरोखर असामान्य व्यक्तिमत्त्वे डावलून सोयीस्करपणे संकुचित वैदिक विचारसरणीला अनुसरुन पुष्यमित्र शुंगाचे गोडवे गायले आहेत. याच शुंगाने "कौटिल्याचे अर्थशास्त्र" हा ग्रंथच नष्ट केला. उत्तुंग व अद्वितीय व्यक्तिमत्व असलेल्या छत्रपती संभाजी महाराजांची काही संकुचित व लेखणी हातात असणाऱ्यांनी जाणीवपूर्वक केलेली बदनामी, अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

तर दुसरा गट सत्यशोधन करणाऱ्या बहुजन हितायवादी, समतेचा पुरस्कार करणाऱ्या वैचारिक लेखकांचा.यांमध्ये तथागत बुद्धांपासून सुरुवात होते तर फुले, आंबेडकर, दिनकरराव जवळकर, विठ्ठल रामजी शिंदे, शेजवलकर, कृष्णराव केळूसकर, राहुल सांस्कृतायन, दामोदर धर्मानंद कोसंबी, कॉम्रेड शरद पाटील, आ.ह.साळुंखे, डॉ. जयसिंगराव पवार, अनंत दारव्हटकर, पुरुषोत्तम खेडेकर, डॉ. आनंद पाटील, डॉ. पंजाबराव श्यामराव देशमुख, डॉ.य.दि. फडके अशी कितीतरी नावे सांगता येतील.

प्रस्तुत वरील सर्वांच्या लेखनाचा परामर्श घेता येणे या लेखात विस्तारभयाने शक्य नाही. मात्र यांच्या लेखनाच्या अभ्यासातून स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्याच्या ज्या प्रवृत्ती दिसून येतात त्या पुढील प्रमाणे-

**स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्याच्या प्रवृत्ती-**

१- साहित्यात सांस्कृतिनिष्ठ व समतानिष्ठ असे गट दिसून येतात.

२- धर्मनिरपेक्षता, लोकशाही मूल्ये, समता, वाढते शिक्षणाचे प्रमाण, फुले, आंबेडकर, राजर्षी शाहूमहाराज, श्रीमंत सयाजीराव गायकवाड, इत्यादीचे केवळ वैचारिक कार्यच नव्हे तर, त्यांनी प्रत्यक्ष केलेल्या सामाजिक, राजकीय,आर्थिक सुधारणा या पुरोगामी पार्श्वभूमीवर प्रस्थापित, रुढ विचारसरणीशी संबंधित लेखनाची सत्यता पडताळून पाहणे, सत्यान्वेषन करणे यांत वाढ होतांना दिसून येत आहे.

३- इतिहासाची प्राथमिक साधने, व साधार लेखन यांत वाढ होतांना 'सत्य' स्वीकारणे हे अपरिहार्य झाले आहे.

४- मूळ चुकीच्या गोष्टींना छेद दिल्याने, इतिहासाला नवा अर्थ प्राप्त होत आहे, त्यातून समाजप्रबोधन सातत्याने होत आहे. डॉ.जयसिंगराव पवार, आ.ह. साळुंखे, कॉम्रेड शरद पाटील यांसारख्या विचारवंतांनी तर संस्कृत भाषांचा अभ्यास करुन मूळातून प्रत्येक गोष्टींची चिकित्सा केली व त्याच्या आधारावरच मूळ सत्य शोध करुन घटना, इतिहास, इत्यादींची पुनर्मांडणी केली. जसे- 'मातृसत्ताक', 'पितृसत्ताक' पद्धती, त्यावर आधारित समाजरचना व त्यावर आधारित तत्कालीन समाजव्यवस्था, त्यातील व्यक्तिरेखा यांचे सत्यशोधन व त्यांत असलेली असमता, शोषण, अन्याय, भेदांवर आधारित समाजव्यवस्था यांची पाळेमुळे शोधली व ते कसे संकुचित, स्वार्थी व लबाडीवर आधारलेले आहे हे प्रथमतः जनसामान्यांपुढे आणले. आ.ह.साळुंखे यांनी संत चरित्रांवर सुद्धा प्रकाश टाकून त्यांनी सत्यशोधन व सर्वसामान्य समाज यांच्या हिताचा कसा विचार केला व ते खऱ्या अर्थाने कसे समतावादी होते, हे साधार शोधून काढले आहे. "विद्रोही तुकाराम", हे पुस्तकाचे नाव सुद्धा या दृष्टीने विचारांत घेण्यासासारखे आहे.याउलट संकुचित व संस्कृतीनिष्ठ विचारवंतांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांना त्यांच्या "वधानंतर" स्वर्गातून पुष्पक विमान कसे आले, व त्यांना स्वर्गात कसे घेऊन गेले, याचे रसभरीत वर्णन केले.देव, धर्म, मोक्ष या भाबड्या कल्पनांमध्ये जनसामान्यांना अडकवून, पाप-पुण्य या भ्रमजालात, चक्रव्यूहात अडकवून सत्य दाबून ठेवायचे, किंवा सोयीस्करपणे अर्थ बदलायचा, किंवा त्या गोष्टीचे उदात्तीकरण करुन सत्याचा,

वस्तुस्थितीचा लोप करायचा! जसे- गौतम बुद्ध यांना परमेश्वराचा नववा अवतार ठरवून त्यांचे विचारच दाबून टाकले, अमानवी रुप देऊन इहलोकीचे जीवनच निरर्थक ठरवून मूळ प्रश्नांना बगल देण्याचे काम केले.

या सर्व प्रवृत्ती खूपच महत्वाच्या आहेत. अशा काही अनेक प्रवृत्ती असल्या तरी येथे फक्त संशोधन विषयाशी निगडीत प्रवृत्तींचाच समावेश केला आहे. या वैचारिक परिवर्तनातून पुढील काही गोष्टी घडून येण्यास मदत झाली. त्या खूपच महत्त्वाच्या आहेत-

**स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्याचे महत्त्व –**

१- या वैचारिक साहित्यामुळे कोणीतरी सांगितले म्हणून ती गोष्ट जशीच्या तशी न स्वीकारता ती इतिहासाची साधने, सत्यता, यथार्थ अर्थ लावणे, असत्य बाबींचा विरोध दर्शविणे इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी घडायला लागल्या.

२- असमता, शोषण, अत्याचार, व चुकीच्या गोष्टी यांचे मूळ कशात आहे, हे या सामान्य लोकांना या वैचारिक प्रवाहामुळे समजण्यास मदत झाली.व लोक इतिहासाचा नव्याने विचार करू लागले.

३- समता, शोषणमुक्त समाज निर्मिती, मानवमुक्ती, स्त्रीमुक्ती यांसारख्या पुरोगामी चळवळींना वैचारिक पाठबळ मिळाले. त्यामुळे या चळवळींना भक्कम पाया व दिशा मिळाली.

४- सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत सण,उत्सव, परंपरा, रुढी इत्यादींना नवीन संदर्भ, अर्थ प्राप्त होत आहेत, व त्यामुळे मानवीय दृष्टीकोन, एकात्मिक राष्ट्रीय दृष्टिकोन रुजण्यास मदत मिळत आहे. व संकुचित राष्ट्रवाद, मूलतत्ववाद यांचा परामर्श घेण्यास मदत मिळत आहे.

५- सर्वात महत्वाचे म्हणजे- स्त्रियांना मंदिर प्रवेश नाकारणे, स्त्रीभ्रूणहत्या, बलात्कार, स्त्रियांच्या संदर्भातील रुढीग्रस्तता यांच्या विरोधात लढतांना मानवीय व नैतिक पाठबळ प्राप्त होत आहे.

६- या मानवतावादी वैचारिक प्रबोधनामुळे लोकशाही मूल्यांवर आधारित कायद्यांनाही नवीन अर्थ, संदर्भ प्राप्त होत असून त्यातील संकुचितता कमी होत असून न्यायाची कक्षा विस्तारत जातांना दिसत आहे. डॉ. आंबेडकर यांनी केलेले मनुस्मृती दहन, मनुस्मृतीचा लावलेला अर्थ व हिंदू कोड बिल या गोष्टी याचे धडधडीत उदाहरण आहे. "कालेलकर शिफारसीं" नंतर भटक्या विमुक्तांची "सेटलमेंट" मधून झालेली मुक्तता ही सर्व वैचारिक साहित्याची फळे आहेत. "मानव जन्माने चोर वा अपराधी नसतो" हे मानवी मूल्य वैचारिक साहित्यातून आले नसते तर भटक्या विमुक्तांची "सेटलमेंट" मधून मुक्तता अजूनही झालीच नसती !

थोडक्यात, स्वातंत्र्योत्तर भारतीय वैचारिक साहित्याचे महत्त्व यावरून लक्षात येते.

**संशोधनाचे निष्कर्ष –**

प्रस्तुत माहितीच्या आधारे, स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्याचे महत्त्व व प्रवृत्ती या सकारात्मक व पुरोगामी परिवर्तन घडवून आणणाऱ्या असल्यातरी त्यांचा सार्वत्रिक प्रसार व प्रचार, लेखन हे वाढते असले तरी तुलनेने ते नगण्य आहे.

- भौतिक परिवर्तनाबरोबरच जागतिकीकरण, व्यापारवाद व शासनाचे खाजगीकरणाचे धोरण यामुळे परिवर्तन हे पुन्हा पुढून मागे जाते आहे की काय, असे म्हणण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. मानवी मूल्यांची जागा भांडवली मूल्ये घेऊ लागली आहेत.लोकशाही मूल्यांधारित शासन व्यवस्थे ऐवजी संकूचित राष्ट्रवादी शासनव्यवस्था येऊ घातली आहेत.
- डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉम्रेड गोविंद पानसरे, कलबुर्गी या पुरोगामी विचारवंतांच्या हत्या विचार प्रवृत्त करायला लावणाऱ्या आहेत.
- सध्या तरी वैचारिक श्रेष्ठतेपेक्षाही "ज्याच्या हाती सता तो पारधी" हे महत्वाचे ठरत आहे. सार्वजनिक हितासाठी विचार राबवण्या ऐवजी सत्तेसाठी "विचार" राबविण्याच्या प्रवृत्तीत वाढ होतांना दिसत आहे.
- मात्र विचार हे जेवढे दाबले जातील, तेवढे ते उसळी मारून वर येतात, या बाजूने पाहिले तर सत्यशोधन व

पुरोगामित्व जोपासणाऱ्या वैचारिक लेखनात मात्र भर पडत जातांना दिसत आहे.

**समारोप-**

एकूणच स्वातंत्र्योत्तर भारतातील पुरोगामी वैचारिक साहित्य हे भारतीय प्राचीन वारसा सांगणाऱ्या विचारधारेपेक्षा त्यातील विरोधाभास, संकुचितता, यांवर प्रकाश टाकून तिसऱ्या-चौथ्या शतकांपासूनचा बौद्धकालीन भारत, त्यांतील विकास, समता, समृद्धी व सांस्कृतिक पार्श्वभूमी या अंगाने जाऊन धर्म, ईश्वर, संस्कृती, चातुर्वर्ण्य, इतिहास, शिवकालीन इतिहास, इत्यादी अंगाने विश्लेषण करणारे, सत्याची पाळेमुळे खणून काढणारे असे आहे.

यांत पाश्चात्य पुस्तकांचा अनुवाद व त्याआधारे सत्य इतिहासाचा मागोवा असाही एक महत्त्वाचा प्रवाह दिसून येतो.मूळ संस्कृत भाषेतील साहित्याचे यथार्थ रुप समोर ठेवून लेखन करणारे, चुकीच्या गोष्टी खोडून नवीन मांडणी करणारे आणि यातूनच छोटे छोटे लेखकही यांतून उदयाला येत आहेत, ही महत्त्वाची बाब आहे.आज संत साहित्याचे पुनर्जागरण घडून येत आहे व त्याआधारे अन्याय, शोषण, विषमता, जातिभेद इत्यादींना थारा देणाऱ्या विचारांना दूर करण्याचे कार्य जोमाने होत असून, ही भागवत धर्म विचारांची धारा नव्याने रुजू पाहत आहे, निर्माण होत आहे. आणि म्हणूनच काल्पनिक साहित्यापेक्षा आज सत्यशोधनावर आधारित कादंबऱ्या निर्माण होत आहे,ज्या वाचकांना योग्य दिशेने विचार करण्यासाठी प्रवृत्त करत आहे. यांचे उत्तम उदाहरण द्यावयाचे झाले तर- भालचंद्र नेमाडे यांची नुकतीच आलेली “हिंदू:जगण्याची समृद्ध अडगळ”, रंगनाथ पठारे यांची “सात पाटील कुलवृत्तांत.” या केवळ मनोरंजनात्मक न राहता संशोधनात्मक झाल्या आहेत.

वैचारिक साहित्याच्या या नवविचार धारेमुळे “साहित्य हे केवळ प्रतिभेचा आविष्कार न राहता, तो धर्म, ईश्वर या आभासी कल्पनांपेक्षा मानवी मूल्यांचे उपयोजन करणारे एक खरेखुरे माध्यम बनत आहे !

**संदर्भ —**

१- आ.ह.साळुंखे [डॉ.] ‘मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती’,२००६ लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई सहावी आवृत्ती [I]
२- आ.ह.साळुंखे [डॉ.] ‘स्त्रीविषयक चिंतन’, २०१६ लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती.
३- केळूस्कर कृष्णराव अर्जुन ‘गौतम बुद्धाचे चरित्र’,२०१५,नाग-नालंदा प्रकाशन,ईस्लामपूर, संपादकीय आवृत्ती.
४- गोखले प्रदीप [डॉ.] ‘विषमतेचा पुरस्कर्ता मनू’,१९८३ ,सुगावा प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती.
५- चव्हाण धनंजय [डॉ.] अनुवाद ‘अशोक भारताच्या हरवलेल्या सम्राटाचा शोध’, [चार्लस ॲलन ]२०१९, EMBASSY Books प्रकाशन,मुंबई, प्रथमावृत्ती.
६- कोसंबी दामोदर धर्मानंद २०१७, ‘पुराणकथा आणि वास्तवता’, [अनुवाद-वसंत तुळपुळे] लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई सहावी आवृत्ती.
७- देशमुख पंजाबराव श्यामराव [डॉ.] ‘धर्माचा वैदिक वाङ्मयाचा उदय आणि विकास’,२०१८,आनंद ग्रंथसागर प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती.
८- देशमुख मा.म.[प्रा.],’वंश,भाषा श्रेष्ठत्व आणि सत्य’, २००८, शिवभारती प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती.
९- नेमाडे भालचंद्र, “हिंदू:जगण्याची समृद्ध अडगळ”, २०१० पॉप्युलर प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती.
१०- पठारे रंगनाथ, “सात पाटील कुलवृत्तांत”, २०२०, शब्दालय प्रकाशन, प्रथम आवृत्ती.
११- पवार जयसिंगराव [डॉ.] छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ,२००९, रिया पब्लिकेशन,कोल्हापूर,द्वितीयावृत्ती.
१२- फडके य.दि.[डॉ.],दिनकरराव जवळकर समग्र वाङ्मय,२००९, महात्मा जोतीराव फुले समता प्रतिष्ठान, पुणे, दुसरी आवृत्ती.
१३- सावरकर वि.दा. ‘भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने’,२०१२ रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती.